# प्रसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 18/11/2023

| अ. क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मोर्शी 553/2023 कलम 324,504, 506,34, 143,147, 148,149 भा.दं वि | शेख आपताब मोहम्मद आपताप 19 वर्ष राहणार- खोलवाट पुरा मोर्शी तालुका मोर्शी जिल्हा अमरावती | 1) ओम घाटोळ 2) अभिषेक बोडके 3) आर डी त्याचे नाव माहित नाही 5)इतर दोन ते तीन लोक सर्व राहणार मोर्शी तालुका मोर्शी जिल्हा अमरावती | रामजीबाबा बस स्टॉप जवळ वडाच्या झाडाजवळ मोर्शी दोन किलोमीटर उत्तर | 16/11/23 चे 19/00 वा | 17/11/2023 चे 16 /45वा | हकीकत :- अशा प्रकारे आहे की, यातील नमूद घता वेळी व ठिकाणीही फि यांनी ओम घाटोळ याला कॉल केला व त्याला म्हटले की तुझे त्या पोरीसोबत काय आहे त्यावर त्या ने फि ला उलट म्हटले की तुझे त्या मुली सोबत काय आहे असे म्हटल्यावर त्यावर घाटोळ यांनी फिला म्हटले की तू मला रामजी बाबा जवळील बस स्टैंड वर भेट तर फिर्यादी त्याला भेटण्याकरिता बस स्टॅन्ड जवळ गेला आणि फि यांनी घाटोळ ला कॉल केला व त्याला विचारले की तू कोठे आहे तेव्हा त्याने फिला म्हटले की मी वडाच्या झाडाजवळ आहे तू इकडे ये असे म्हटले असता फि तेथे गेले व ते थे अचानकपणे ओम घाटोळ अभिषेक बोडके ,प्रियल व आरडी त्याचे नाव माहित नाही तसेच इतर दोन ते तीन लोक यांनी फिला मारायला सुरुवात केली तसेच ओम घाटोळ याने त्याच्या हातातील असलेल्या लोखंडी पाईपने फिच्या डोक्यावर मारले तेव्हा फि चे मित्र जय फुसे, अल्ताफ कपिल यांनी भांडण सोडायला गेले असता जय पुसे याचे हातावर सुद्धा लोखंडी पाईप नेओम घाटोळ याने मारला व आरडी यांनी जय पुसे याच्या मांडीवर हातावर डोक्यावर वस्तरा मारला तसेच फि च्या उजव्या हाताच्या अंगठ्यावर सुद्धा वस्तरा मारला तसेच अभिषेक बोडके यांनी सुद्धा फिचे डाव्या हातावर लोखंडी रोड मारला व इतर इतरांनी लाकडी काठ्यांनी मारहाण केली अश फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 2 | कु–हा 360/2023 कलम 306, 504, 506 भा.द. वि. | शिवनाथ भाजेराव सावंत, वय 60 वर्श, रा. माळेगाव ता. तिवसा जि. अमरावती | प्रकाश जगण शिंदे वय 27 वर्श रा. माळेगाव ता. तिवसा जि. अमरावती | ग्राम माळेगाव मृतकचे शेतात | 11/11/2023 चे सकाळी 07/30 ते 09/30 वा. दरम्याण | 17/11/2023 चे 19.10 वा | हकीकत या प्रमाणे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील रहिवासी असुन यातील आरोपी हा मृतकचे पत्नीला फोन करत होता या कारणावरुन मृतकचे व आरोपीचे नमुद घटना ता वेळी भांडण झाले होते. दि.11/11/2023 रोजी सकाळी 7/30 वा दरम्याण मृतकचे व आरोपीचे भांडण झाले त्यावेळी आरोपीने फिर्यादीचे मुलाला हाथाबुक्क्यांनी मारहान करुन शिवीगाळी केली होती या गोश्टीचा राग मनात धरुन मृतक हयाने त्याचे शेतात जावुन पेट्रोल अंगावर घेवुन स्वताला जाळुन घेतले व उपचारादरम्याण दि 13/11/2023 चे 21/30 वा मरण पावला तसेच मृतकची पत्नी हीने सुध्दा डॉ. पंजाबराव देशमुख मेडीकल कॉलेज अमरावती येथे दवाखान्यात साडीने गळफास घेवुन आत्महत्या केली. मृतकने आपले डीडी बयाणामध्ये आरोपीने लाथाबुक्क्यांनी मारहान केल्याने अपमानजनक वाटल्याने स्वताला जाळुन घेतल्याचे सांगीतले आहे अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट, मृतकचे डीडी बयाण व पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर याचेकडुन प्राप्त 00/23 अन्वये प्राप्त मर्गचे कागदपत्रावरुन सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला. शांतता आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | धारणी 689/2023 कलम 354,323, 504, 506 ,34, भा.दं वि अनुसूचित जाती जमाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम 1989 कलम 3(1)(w) (2), 3(2) (va) | सा 35 वर्ष तालुका धारणी जिल्हा अमरावती | 1) अब्दुल राजिक अब्दुल रफिक वय 25वर्ष 2) अब्दुल आशिफ अब्दुल रफीक वय 23 वर्ष दोघे रा दुबई मोहल्ला धारणी 3) शे सादिक शे भुरू वय 26 रा कुरेशी मोहल्ला धारणी | | 17/11/23 चे दुपारी 16/00 वा | 17/11/2023 चे 19 /24वा | हकीकत :- अशा प्रकारे आहे कि येथील फिर्यादी ही ग्राम धारणी येथे घुंगरू बाजार असल्याने ग्राम धारणी येथे बाजारात आली असता यातील नमूद आरोपी त्यांना फिर्यादी ही आदिवासी समाजाची असून आहे हे माहीत असून सुद्धा फिर्यादीच्या हात पकडून तिला मोबाईल नंबर मागितला असून फिर्यादीच्या विनयभंग केला फिर्यादी व तिच्या पतीला लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जीवाने मारण्याची धमकी दिली फिर्यादीचे जबानी रिपोर्ट मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 4 | परतवाडा 989 / 23 कलम 143,147,149, 294,506 भादवि | फरजाना परविन अब्दुल सलिम वय 32 वर्ष रा. एकता नगर कांडली | 1. मोनु उर्फ जमीरोददीन कदीरोददीन 2. अमिरोददीन कदीरोददीन 3. नुरूददीन कदीरोददीन 4. मोनु चा बाप कदीरोददीन 5. करण 6. सोहेल नवाब 7. राम जयराम झारखंडे सर्व रा. एकता नगर कांडली | एकता नगर कांडली 01 किमी दक्षिण | 17.11.2023 चे 14.00 ते 14. 30 वा. | 17.11.2023 चे 22.44 वा | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन विनाकारण फि चे घरावर हातात लाठया–काठया घेवुन येवुन घरावर दगड मारून फिस " अश्लील भाषेत शिवीगाळ केली व बाहेर निघाल्यास मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता